दैनिक www.esuryodaylive.com
Email : suryodaykokan.123@gmail.com

# महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष २ रे || अंक २१२ || मंगळवार, १६ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# कर्जतमध्ये आदित्य ठाकरेंची १६ जुलैला सभा होणार!

## कर्जत विधानसभा उमेदवारी जाहीर करणार

कर्जत - जयेश जाधव

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा युवासेनाप्रमुख - आमदार आदित्य साहेब ठाकरे यांची जाहीर सभा मंगळवार दिनांक १६ जुलै रोजी कर्जत येथे शेळके हॉलमध्ये सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली असल्याने या सभेची जय्यत तयारी कर्जत विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसैनिक युवासैनिक व महिला आघाडीच्या वतीने करण्यात येत आहे. आज १२ जुलै पुन्हा एकदा या सभेची नियोजना संदर्भात आढावा बैठक उत्तर रायगड युवासेना जिल्हाअधिकारी पराग मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली शिवालय मध्यवर्ती कार्यालयात पार पडली १६ जुलै रोजी युवासेना नेते आदरणीय आदित्यसाहेब ठाकरे येणार असल्याने त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या



तयारीला लागा आणि कर्जत विधानसभेत पुन्हा एकदा आपला भगवा फडकवा आपल्या प्रत्येकाची आता जबाबदारी वाढली आहे. ङ्ग यावेळी युवासेना जिल्हाधिकारी पराग मोहिते, जिल्हा समन्वयक प्रशांत खांडेकर, जिल्हा चिटणीस निखिल पाटील, उपजिल्हा अधिकारी महेश पाटील, कर्जत विधानसभा अधिकारी ॲड.संपत हडप, तालुका अधिकारी प्रथमेश मोरे, तेजस पाटील, तालुका चिटणीस कल्पेश खडे, निखिल मालुसरे, खालापूर तालुका युवतीसेना संपर्कअधिकारी रिया मालुसरे, खालापूर तालुका युवतीसेना अधिकारी भारती लोते, ङ्खोपोली शहर अधिकारी अदिती गुरव, कॉलेज कक्षाचे प्रमुख सुजल गायकवाड, धर्मेश परमार आदी प्रमुखासह मोठ्या संख्येने सर्व उपतालुका अधिकारी, विभाग अधिकारी, उपविभाग अधिकारी आणि इतर सर्व युवासेना व कॉलेज कक्षाचे पदाधिकारी आणि युवा सैनिक उपस्थित होतेङ्ग आदित्य साहेब ठाकरे मार्गदर्शन करणार असल्याने ही सभा ऐतिहासिक होण्यासाठी कर्जत विधानसभा मतदारसंघातील सर्व युवासैनिकांनी कॉलेज कक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सभेच्या तयारी कडे लक्ष देऊन सभा यशस्वी होण्यासाठी पुढाकार घेऊन कामाला लागावे बैठक संपन्न झाल्यानंतर शिवालय कार्यालयात उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या हस्ते उमरोली जिल्हापरिष चिटणीस या पदावर अजय कराळे याची पत्र देऊन नेमणूक करण्यात आली

## जिल्हा नियोजन समिती सभागृहाचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन

रत्नागिरी, (जिमाका) : ५ कोटी ९८ लाख ८३ हजार निधी मधून सुसज्ज तयार करण्यात आलेल्या जिल्हा नियोजन सभागृहाचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते आज उद्घाटन करण्यात



आले.पालकमंत्री श्री. सामंत यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करुन आणि फित कापून सभागृहाचे उद्घाटन झाले. यावेळी आमदार शेखर निकम, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी,

जिल्हा नियोजन अधिकारी सत्यविनायक मुळे, अधीक्षक अभियंता छाया नाईक आदी उपस्थित होते. जिल्हा नियोजन समितीमधून ३ कोटी ६३ लाख ८४ हजार व विद्युत खर्चासाठी २ कोटी ३४ लाख ९९ हजार असे एकूण ५ कोटी ९८ लाख ८३ हजार निधी यासाठी देण्यात आला आहे.



## कोकण रेल्वेचा प्रवास खडतर झाल्याने मुंबईकडे पोहचण्यासाठी करण्यात आली बसची व्यवस्था

रत्नागिरी :- कोकण रेल्वे दिवाणखवटी येथे बोगदयाजवळ दरड कोसळल्याने मांडवी एकस दिवा पॅसेंजर यातील प्रवाशी यांना मुंबई येथे सोडण्याकरता करिता उपप्रबंधक यांनी केलेल्या मागणी नुसार खालीलप्रमाणे बस पुरवण्यात आल्या आहेत रत्नागिरी ३२ बस चिपळूण १४ बस खेड १२ बस पनवेल पर्यंत रवाना करण्यात आल्या असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

## गडावर मद्यप्राशन करणार्या टवाळखोरांना सरकारचा दणका!

नागपूर : गडकिल्ल्यांसारख्या ऐतिहासिक आणि पवित्र ठिकाणी जाऊन गैरवर्तन करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. काही टवाळखोर तरुण पर्यटनासाठी गडांवर जातात आणि त्या ठिकाणी मद्यप्राशन करतात. एवढंच नव्हे तर त्या ठिकाणी घाण, कचराही केला



जातो. वास्तूवर काही ठिकाणी नावे कोरली जातात. असं घाणेरडं कृत्य करणाऱ्या टवाळखोरांना आता राज्य सरकार चांगलाच दणका देणार आहे. आधी यासाठी केवळ दंड आकारला जायचा, मात्र आता राज्य सरकार कायदा बदलण्याच्या तयारीत आहे, असे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी कठोर पावले उचलली जातील, असं मुनगंटीवार म्हणाले. ते सोमवारी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी विशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या अतिक्रमणावर कारवाई करणाऱ्या अतिक्रमणविरोधी पथकावर दगडफेक झाल्यासंदर्भात भाष्य केले. भविष्यात मोहीम म्हणून राज्यातील सर्व गडकिल्ल्यावरील अतिक्रमण हटवले जाईल. मी सांस्कृतिक खात्याचा कार्यभार हाती घेतल्यापासून गडकिल्ल्यांसंदर्भात गांभीर्याने काम केले जात आहे. पूर्वी गडकिल्ल्यांच्या डागडुजीसाठी १३ ते १४ कोटी रुपये खर्च व्हायचे. मात्र, यंदा गडकिल्ल्यांच्या देखभालीसाठी ८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आगामी काळात सर्व गडकिल्ल्यांवरील अतिक्रमण हटवले जाईल. संबंधित व्यक्तींनी सामोपचाराने ऐकले नाही तर कठोर पाऊल उचलण्यात येईल, असा इशाराही सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

तसेच लंडनच्या वस्तूसंग्रहालयातून आणण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनखांच्या मुद्द्यावरही मुनगंटीवार यांनी भाष्य केले. शिवाजी महाराजांच्या वाघनखांना घेऊन एका इतिहासकाराने विरोध केला आहे. मात्र, त्यामुळे राज्य सरकार आपली भूमिका बदलणार नाही, असे मुनगंटीवार यांनी म्हटले.

# मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा! पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना मिळणार पेन्शन

मुंबई : आषाढी एकादशी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्यामुळे राज्यात सर्वत्र भक्तीमय वातावरण झाले आहे. अशातच विठठ्लाच्या नावाचा गजर करत पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक मोठी घोषणा केली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी 'वारकरी महामंडळ'ची स्थापना करणार असल्याची घोषणा केली होती. त्याअंतर्गत आता पायी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना सुरु करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.



राज्य सरकार परंपरेने महिन्याची वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वृद्धापकाळात वारकरी पेन्शन लागू करणार आहे. या योजनेमुळे राज्यभरातील लाखो वारकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री वारकरी महामंडळच्या वतीने शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

वारकरी महामंडळाचं मुख्यालय हे पंढरपुरात असणार आहे. प्रशासकीय सेवेतील अधिकारी किंवा निवृत्त अधिकाऱ्यांची महामंडळावरती व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. महामंडळाचं भांडवल ५० कोटी इतकं असणार आहे. तसेच, कीर्तनकारांना आरोग्य विमा कवचही दिलं जाणार आहे.

काय आहे वारकरी महामंडळाचं उद्दिष्ट?महाराष्ट्रातील तमाम वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये वारकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण केलं जाणार आहे. तसेच, वारकऱ्यांना पेन्शन लागू केलं जाणार आहे. या महामंडळाच्या माध्यमातून पंढरपूरच्या विकासाला देखील गती येईल. प्रामुख्याने वारकरी संप्रदायाच्या अडीअडचणी प्रश्न सोडवणे, सर्व पालखी सोहळा मार्गाची सुधारणा करणे, वारकरी भजनी मंडळाला भजन व कीर्तन साहित्य करिता अनुदान देणे अशा अनेक मुद्द्यांच्या आधारे हे महामंडळ निर्माण करण्यात आलं आहे. मुख्यमंत्र्यांकडून वारकरी महामंडळाच्या आदेशाची प्रत वारकऱ्यांना देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या महत्त्वाच्या योजना कोणत्या?

सर्व पालखी मार्गांची सुधारणा, स्वच्छता, आरोग्य, निवारा आणि सुविधा यासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करून नियोजन.

आषाढी आणि कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षा, विमा संरक्षण कवच.

वारकरी भजनी मंडळाला भजन आणि कीर्तन साहित्यासाठी (टाळ, मृदंग, वीणा आदी) अनुदान.

कीर्तनकारांना आरोग्य विमा, मानधन सन्मान योजना.

पंढरपूर, देहू, आळंदी, मुक्ताईनगर, सासवड, पिंपळनेर, त्र्यंबकेश्वर, पैठण, कोल्हापूर संस्थान, शेगाव, तारकेश्वर, भगवानगड, अगस्तऋषी, संत सावतामाळी समाज मंदिर, अरण (ता. माढा, जि. सोलापूर) व इतर तीर्थक्षेत्रांचा विकास.

चंद्रभागा, इंद्रायणी, गोदावरी व इतर नद्या प्रदूषणमुक्त करण्याबाबतची कार्यवाही.

